NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक ०१.११.२०२६ रविवार

(कामगिरी)

गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पथकाची कामगिरी :– हद्दपार ईसमास अटक.

दिनांक ०१.११.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे पथकातील अधिकारी व अंमलदार हे हद्यपार आरोपी चेक करीत असता, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, सेक्टर क्र. १२, चिल्ला शरीफ दर्गाहजवळ, श्रीकृष्णधाम झोपडपट्टी, नागपूर येथे राहणारा हद्दपार इसम नामे आतिष उर्फ ऑस्टीन रॉबर्ट फ्रॉन्सीस वय २८ वर्षे यास त्याचे राहते घरी चेक केले असता, तो घरी मिळुन आला. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार आदेश क्र. ११/२०२६ दिनांक २१.०८.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने राहते घरी समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलीस ठाणे कोराडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आली आहे. आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि भरत कऱ्हाडे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे यशोधरानगर :– सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न करणारे आरोपींविरुध्द गुन्हा दाखल, तीन आरोपींना अटक.

दिनांक ३१.१०.२०२६ चे १३.३० वा. चे सुमारास, फिर्यादी यांचा भाऊ नामे रुपेश साहेबराव शिर्के वय ३६ वर्ष रा. वांजरी जुनी वस्ती, वनदेवी नगर, यशोधरानगर, नागपूर हा रेल्वे पटरी, गुलशन नगर परिसरात गाई–म्हशी चारुन घरी परत आला असता, आरोपी १) मयुर राजेश साखरे वय ३० वर्ष रा. माजरी, पार्वती नगर, नागपुर याने त्याचे तीन साथीदार आरोपी २) राहुल मनोज बाळबुधे वय २६ वर्ष रा. प्रवेशनगर, नागपूर ३)

मोहम्मद कलीम मोहम्मद आरीफ अन्सारी वय २४ वर्ष रा. गुलशन नगर, रेल्वे पटरीजवळ, नागपूर व ४) अमन विजय शाहु वय २२ वर्ष रा. गुलशन नगर, नागपूर यांचेसह तेथे आला. आरोपी क्र. २ याने फिर्यादीचे भावास घराबाहेर बोलावुन त्याचेसोबत एक महिन्याआधी झालेल्या भांडणाचे कारणावरुन वाद घातला व त्यास फिर्यादीचे घरामागे नेऊन सर्व आरोपींनी हातबुक्कीने मारहाण केली. आरोपींपैकी एकाने त्याचेजवळील चाकुने फिर्यादीचे भावाचे छातीचे उजव्या बाजुस वार करुन त्यास गंभीर जखमी केले. त्याने आरडाओरडा केला असता, आरोपी हे पळुन गेले. गंभीर जखमी यास फिर्यादीने उपचाराकरीता अनिरुध्द हॉस्पिटल, रानी दुर्गावती नगर येथे दाखल केले असुन उपचार सुरु आहे.

याप्रकरणी आरोपींनी जुने भांडणाचा राग धरुन फिर्यादीचे भावास गंभीर जखमी करुन सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न केला अशा फिर्यादी आकाश साहेबराव शिर्के वय २५ वर्षे रा. वांजरी जुनी वस्ती, वनदेवी नगर, यशोधरानगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि शशिकांत नागरगोजे ८४५९६९७३७० यांनी आरोपींविरूध्द कलम ११०,११५(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, त्वरीत दखल घेवुन, गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेऊन तात्काळ आरोपींचा शोध घेतला व आरोपी १,२ व ३ यांना अटक केली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे गणेशपेठ :– चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ३०.१०.२०२६ चे १६.०० वा. ते १८.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी श्रीमती योगीता उमेश बानाईत, वय ४८ वर्षे रा. प्लॉट नं. ५०, स्नेहपार्क नगर, चैतन्य बिल्डींग, पांजरी बेलतरोडी, नागपूर यांनी त्यांचे गहाण ठेवलेले वेगवेगळे सोन्याचे दागिने सोडवून, त्यांचे पर्समध्ये नमुद दागिने एकुण किंमती ३,००,०००/–रू. चा मुद्देमाल ठेवून बडकस चौक, महाल येथे त्यांचे नातेवाईकांकडे गेले. तेथून मॅक्सी ऑटोरिक्षाने घरी जाण्यास निघाले व काही कामानिमित्त शुक्रवारी तलाव येथे उतरले असता, त्यांना त्यांचे पर्सची चैन उघडी दिसली. पर्स चेक केली असता, त्यामध्ये सोन्याचे दागिने ठेवलेली लहान पर्स दिसून आली नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे बॅगमधील वर नमुद मुद्देमाल असलेली लहान पर्स चोरून नेली.

अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. आशिष जाधव ८०१०९५२०६४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.